# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०३/२०२४ (शुक्रवार) दुपार**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## वाहनासह एकुण ३,५५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २८/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ पो.स्टे. हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, एका ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफने नाकाबंदी करीत असतांना वाहन क्र. एम एच ४० सी एच ९३५१ ज्याला लागुन असलेली ट्रॉली क्र. एम एच.— ४०/सी एच.— ७७५१ येतांना दिसला. सदर ट्रॅक्टर थांबवून पाहणी केली असता वाहन क्र. एम एच ४०/ सी एच ९३५१ ज्याला लागुन असलेली ट्रॉली क्र. एम एच ४० सी एच ७७५१ मध्ये चालक **आरोपी नामे— मारोती ज्योतीराम डोंगरे, वय ४४ वर्ष, रा. गंगापुर उमरेड त. उमरेड जि. नागपुर** हा विनापरवाना रेती वाहतूक करित असल्याचे समजले. ट्रॅक्टर चालकास कागदपत्र व रेती वाहतुकीचा परवाना (रॉयल्टी) विचारले असता त्याने ट्रॅक्टरचे कागदपत्र व रेती वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे सांगीतले. आरोपींच्या ताब्यातून ०१ ब्रास रेती किंमती ५०००/— रू, वाहन क्र. एम एच— ४०/सी एच ९३५१ किंमत २,५०,०००/—रू , ट्रॉली क्र. एम एच ४०/सी एच ७७५१ किंमती ५०,०००/—रू असा एकुण ३,५५,०००/— रू चा मुद्देमालाची विनापरवाना शासनाचा महसुल बुडवुन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करून सरकारी खनिज रेतीची अवैदयरित्या चोरटी वाहतुक करतांना करून आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोशि सुरज हिवरकर पोस्टे भिवापुर यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन भिवापूर येथे ट्रक **चालक नामे— मारोती ज्योतीराम डोंगरे, वय ४४ वर्ष, रा. गंगापुर उमरेड त. उमरेड जि. नागपुर व मालक नामे— शुभम राजेंद्र मेंढे, रा. अलंकार चौक उमरेड त. उमरेड जि. नागपुर** यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९ भादंवि. सहकलम ४८(७), ४८(८), महाराष्ट्र जमीन महसूल कायदा, सहकलम ४, २१ खा. आणि ख (नि. आणि वि) अधि १९५७, सहकलम ३ सा.स.नु.प्र अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १) याला अटक करण्यात आली आहे.

# लग्न करून फसवणुक करणाऱ्या आरोपीतांना नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले अटक

**पोस्टे अरोली:—** अंतर्गत मौजा कोदामेंढी हटवार पेट्रोलपंप येथे दिनांक ३१/०१/२०२४ चे ०३/०२/२४ चे १०.०० वा पासुन ते ०६.०० वा पर्यंत यातील फिर्यादी नामे— मनोहर दशरथ मेश्राम, वय ६७ वर्ष, रा. वाकेश्वर तह. मौदा यांचे मुलाचे लग्नासाठी आरोपी क्र. **०१) सतीश दिपक हिरेखन वय २७ वर्ष ०२) अमित टेकाम रा. नागपूर व आरोपी महिला क्र. ०३ व ०४** यांनी आरोपी महीला क्र. ५ हीचे नाव बदलून फिर्यादीचा मुलगा प्रविण मनोहर मेश्राम यांचे सोबत लग्न लावून दिले, त्याबदल्यात नमुद आरोपींनी नगदी ५०,०००/—रू. घेतले व लग्नानंतर आरोपी क्र. १ ते ४ यांनी आरोपी क्र. ५ हिला आपल्या सोबत परत नेवून फिर्यादी यांची फसवणूक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे अरोली येथे आरोपींविरूद्ध कलम ४१९, ४२०, ३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद असुन आरोपी क्र. १) व ४) यांना अटक करण्यात आली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर